भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

प्रस्तावना:-

**विषय:- प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याणरोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे.**

प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याणरोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे कामी रक्कम रु.२,२२,६२,३००/- मात्र प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक २४/०२/२०२४ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास ठराव क्रं.३७७ दिनांक २८/०२/२०२४ अन्वये आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु.२,२२,६२,३००/- ई-निविदा सुचना क्र.१८८/२०२३-२४ (१०२०७९३) दि.२९/०२/२०२४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.१८/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यापैकी पात्र झालेल्या निविदा खालीलप्रमाणे आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.००% कमी दराने** |
| २ | मे. झा.पी.ॲण्ड कंपनी | अंदाजपत्रकिय दराने |

वरील पैकी **मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल** यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा १.००% कमी दराची म्हणजेच रक्कम **रु.२,२०,२१,८४४/-** (रु.दोन कोटी वीस लाख एकवीस हजार आठशे चव्वेचाळीस मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- ५९७ दिनांक :-३० /०९ /२०२४

मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांची अंदाजपत्रकिय दररपेक्षा १.००% कमी दराची म्हणजेच रक्कम **रु.२,२०,२१,८४४/-** (रु.दोन कोटी वीस लाख एकवीस हजार आठशे चव्वेचाळीस मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रातील टेमघर कल्याणरोड लाभ इन्क्लेव प्रोजेक्ट व लाभ इन्क्लेव ते पाईपलाईन पर्यतचा रस्ता विकसित करणे.कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.साई एस.एस.के इन्फ्रास्ट्रक्चरल यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.श.महानगरपालिका**